# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

## टाटा पॉवर कंपनी लि.- वितरण (टीपीसी -डी) ला दि. १ सप्टेंबर, २०१८ पासून लागू होणारा वीज दर

टाटा पॉवर कंपनी लि.- वितरण (टीपीसी - डी) ही मुंबई शहरात आणि त्याच्या बाहेर काही क्षेत्रात विजेचे वितरण करणारी एक परवानाधारक आहे. टीपीसी -डी ची आर्थिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ करिता अचूक समायोजन (truing-up), २०१७-१८ करिता तात्पुरते अचूक समायोजन (provisional truing-up), आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ ते २०१९-२० यसठी सुधारित एकूण महसुली गरज आणि आणि वीज दरास मंजुरीसाठीची याचिका दि. ६ जुलै, २०१८ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दाखल करुन घेतली.

आयोगाने या याचिकेवर जनतेकडून लेखी सूचना मागविल्या आणि दि. ३ ऑगस्ट, २०१८ रोजी जन सुनावणी देखील घेतली. या प्रक्रियेनंतर आयोगाने, **दि. १२ सप्टेंबर, २०१८** च्या आदेशाद्वारे २०१८-१९ आणि २०१९-२० या कालावधीकरिता (टीपीसी -डी) ची एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित केला आहे. सुधारित वीज दर दिनांक **१ सप्टेंबर, २०१८** पासून अंमलात येतील.

आयोगाच्या या आदेशामधील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

१) आयोगाने आर्थिक वर्ष २०१८-१९ ते २०१९-२० साठी सुधारीत एकूण महसुली गरज खालील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे निश्चित केली आहेः

| अनु. क्र. | तपशील | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|
| १ | (टीपीसी -डी) ने प्रस्तावित केलेली एकूण महसुली गरज (रु. कोटीत) | ३,४३७ | ३,८७३ |
| २ | आयोगाने मंजूर केलेली एकूण महसुली गरज (रु. कोटीत) | ३,३१० | ३,४६२ |
| ३ | तूट/(शिल्लक) (रु. कोटीत) | १३१ | ६९६ |
| ४ | वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च (रु. प्रति युनिट) | ७.३९ | ७.५१ |

२. टीपीसी -डी च्या ग्राहकांना आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या विद्यमान लागू असलेल्या दरामध्ये एकूण ४ टक्के वाढ होईल आणि आर्थिक वर्ष २०१९-२० च्या वीज दरात २ टक्के वाढ होईल. वीज दरातील या वाढीमुळे शिल्लक नियामक मत्ता आकारांच्या वसुलीसह (आरएसी) मागील संपूर्ण तूट भरुन काढण्यात येईल.

३. चेंजओव्हर ग्राहकांमध्ये सुमारे ५.६३ लाख ग्राहकांचा समावेश असून यामध्ये ५.४९ लाख लघु-दाब ग्राहक आहेत, ज्यांना टीपीसी-डी कडून, रिलायन्स इन्फ्रास्टक्चर लि.वितरण (आरइन्फ्रा-डी) च्या विद्युत जाळयाच्या माध्यमातून, वीज पुरवठा केला जातो. टीपीसी -डी ही या क्षेत्रातील आणखी एक वितरण परवानाधारक आहे. आयोगाने **दि. १२ सप्टेंबर, २०१८** रोजी आरइन्फ्रा-डी साठी देखील वीज दर आदेश निर्गमित केला आहे.

४. टीपीसी-डी च्या ०-१०० युनिट्स वापर करणाऱ्या चेंजओव्हर निवासी ग्राहकांच्या आणि आरइन्फ्रा-डी च्या ग्राहकांच्या वीज दरात मोठा फरक असणार नाही अशा रीतीने वीज दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत :

| निवासी ग्राहक | परवानाधारक | ग्राहकांची संख्या | सरासरी आकारणीचा दर (रु/युनिट) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यमान वीज दर | २०१८-१९ | २०१९-२० |
| १०० युनिट्सच्या वीज वापरासाठी | आरइन्फ्रा-डी | ६.३६ लाख | ४.५८ | ५.१० | ५.४२ |
| | टीपीसी-डी (चेंजओव्हर) | १.०१ लाख | ४.७० | ४.९५ | ५.२० |
| | टीपीसी-डी (स्वतःचे) | ०.४९ लाख | ४.२२ | ४.९३ | ५.१८ |

५. राज्यातील विद्युत वाहनांना चालना मिळण्यासाठी, आयोगाने उच्च दाब आणि लघु-दाब व्होल्टेज पातळीवरील विद्युत वाहने (ईव्ही) चार्जिंग स्टेशन्स करिता एक नवीन वर्गवारी निर्माण केली आहे. ज्याकरिता एकत्रित आकार रु. ६ प्रति युनिट आणि मागणी आकार रु. ७० प्रति केव्हीए प्रति महिना राहील. याशिवाय ते टाईम-ऑफ-डे (टीओडी) वीज दरासह पॉवर फॅक्टर प्रोत्साहन/दंडासाठी देखील पात्र असतील.

६. विद्यमान आदेशांची अंमलबजावणी पुढे चालू ठेवताना, अति उच्च-दाब (११०/१३२ केव्ही) व्होल्टेज पातळीवर वीज पुरवठा घेणाऱ्या रेल्वे, मेट्रो, मोनारेल्स आणि अन्य ग्राहकांना वहन आकार लागू राहणार नाहीत.

७. त्याशिवाय, कचरा व्यवस्थापन प्रक्रियेच्या सुविधेचे महत्त्व विचारात घेऊन, सदर ग्राहकाची वर्गवारी, विद्युत पुरवठा सार्वजनिक सेवा (शासकीय) आणि सार्वजनिक सेवा (अन्य), जसे असेल तसे, अशी करण्यात आली आहे, ज्यामुळे प्रति युनिट रु. २ ची सूट मिळेल कारण पूर्वी ती वर्गवारी वाणिज्यिक होती. एखाद्या ग्राहकाच्या जागेमध्ये केवळ कचऱ्यातून निर्मितीसाठी कचऱ्यावरील प्रक्रिया /व्यवस्थापन सुविधा अस्तित्वात असेल तर अशी जागा/ग्राहक वर्गवारीला असलेला वीज दर अशा सुविधेला लागू राहील. उदा. गृहनिर्माण सोसायटीतील अशा सुविधेला निवासी वीज दर लागू राहील.

८. आर्थिक व्यवहारांसह सर्व क्षेत्रांमधील अंकेक्षणासाठी (डिजिटायझेशन) शासनाने घेतलेल्या पुढाकारास अनुसरुन, आयोगाने, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय, भीम, इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, मोबाईल वॉलेट इ. द्वारा मासिक विद्युत देयकांचा भरणा करणाऱ्या लघु-दाब वर्गवारीमधील ग्राहकांच्या मासिक विद्युत देयकामध्ये, प्रति महिना रु. ५००/- च्या मर्यादेच्या अधीन राहून, ०.२५ टक्क्यांची सूट (कर आणि जकात वगळून) दिली आहे. त्याशिवाय देयकांचा त्वरित भरणा करणाऱ्या ग्राहकांना त्वरित भरणा सूट (प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काऊंट) मिळेल, ते त्यांच्या मासिक देयकामध्ये ०.५ टक्क्यांची सूट त्वरित सूट मिळण्यास पात्र राहतील.

९. एक विशेष बाब म्हणून 'तात्पुरता पुरवठा–धार्मिक' वर्गवारीला लागू असलेला वीज दर सर्कस उद्योगाला लागू राहील.

१०. स्वतंत्र जागेत लॉण्ड्री/कपड्यांची इस्त्री करुन देण्याच्या सेवा उद्योगाची वर्गवारी आता लघु दाबु-उद्योग- तीन (उद्योग) अंतर्गत करण्यात आली आहे. यापूर्वी हा उद्योग वाणिज्यिक वर्गवारीमध्ये समाविष्ट होता आणि यामुळे वीज दरात प्रति युनिट सुमारे रु. २ ची घट होईल.

११. स्थिर आकारांमधून स्थिर खर्चाच्या वसुलीत वाढ होण्यासाठी स्थिर/मागणी आकारांमध्ये हळूहळू वाढ करणे सुरु ठेवण्यात येईल.

१२. लोड फॅक्टर प्रोत्साहन आणि पॉवर फॅक्टर प्रोत्साहन यांचे सुसुत्रीकरण करण्यात आले आहे.

१३. आयोगाने निरनिराळ्या ग्राहक वर्गवारी अंतर्गत असणारी क्रॉस सबसिडीची पातळी, म्हणजे ग्राहकांची एक वर्गवारी दुसऱ्या वर्गावारीला किती मर्यादेपर्यंत क्रॉस-सबसिडी देईल किंवा घेईल, ही विद्युत अधिनियम, २००३ व राष्ट्रीय वीज दर धोरणाला अधीन राहून ठरविली आहे.

१४. आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी विद्यमान आणि सुधारित वर्गवारी-निहाय वीज दराची तुलना अनुक्रमे **परिशिष्ट १** आणि **परिशिष्ट २** मध्ये देण्यात आली आहे. वर्गवारी-निहाय वीज दरातील वाढ किंवा (कपात) आणि क्रॉस-सबसिडीच्या पातळीमधील घट **परिशिष्ट ३** मध्ये देण्यात आली आहे.

१५. सदर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in आणि www.merc.gov.in या संकेतस्थळावर पाहता आणि उतरवून घेता येईल.